# • स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांना सहाय्यक अनुदान.

1) शासन निर्णय क्र.बी.सी.एच-1097/प्र.क्र.107/मावक-4, दिनांक 16 मार्च 1998
2) शासन निर्णय क्र.विभशा-2010/प्र.क्र.6/विजाभज-2, दिनांक 29 डिसेंबर,2011

**उदिदष्ट:-**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांचा शिक्षणक्रम पूर्ण करता यावा,ग्रामिण भागामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांमधील शाळा गळतीचे प्रमाण कमी व्हावे,आर्थिक दुरावस्थामुळे मागासवर्गीय पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणात अडचणी येऊ नयेत आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकास व्हावा या उददेशाने ही योजना सन 1950-51 पासून कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

**योजनेचे स्वरुप:-**

- **कर्मचारी वेतन:-** वसतिगृह अधिक्षक,स्वयंपाकी,मदतनीस व चौकीदार यांना एकत्रित वेतन/मानधन देण्यात येते.
- **परिपोषण अनुदान:-** प्रति विद्यार्थी प्रतिमाह रु.1500/- प्रमाणे दहा महिन्याकरीता शासनाकडून निवासी विद्यार्थ्यांसाठी परिपोषण अनुदान देण्यात येते.
- **इमारत भाडे:-**इमारत भाडयापोटी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या भाडयाच्या 75% टक्के भाडे संस्थेस देण्यात येते.
- **सोयी सुविधा:-** निवास,भोजन,आंथरुण,पांघरुण,क्रिडा साहित्य इत्यादी सोयीसुविधा मोफत देण्यात येतात.
- **वसतिगृह प्रवेश:-**अनुदानित वसतिगृहांमध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांबरोबर मांग,वाल्मिकी,कातकरी व माडीया गोंड या प्रवर्गातील स्थानिक विद्यार्थ्यांना आणि अनाथ,अपंग व निराश्रित विद्यार्थ्यांना प्राधान्याने विहीत टक्केवारीच्या अधिन राहून प्रवेश देण्यात येतो.
- **अनुदानित वसतिगृहाची संख्या:-** एकूण अनुदानित वसतिगृहाची संख्या व विद्यार्थी संख्या बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.
-

| **एकूण मंजूर अनुदानित वसतिगृहाची संख्या** | | | **मान्य विद्यार्थी संख्या** | | |
|---|---|---|---|---|---|
| मुले | मुली | **एकूण** | मुले | मुली | **एकूण** |
| 41 | 8 | 49 | 1309 | 259 | 1568 |

**संपर्क:-** 1) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद
2) संबंधित अनुदानित वसतिगृहांचे अधिक्षक

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

# • स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलीसाठी अनुदानित आश्रमशाळांना सहाय्यक अनुदान.

1) शासन निर्णय क्र.अजाअ-1099/प्र.क्र.389/मावक-2, दिनांक 29 मे,1999
2) शासन निर्णय क्र.विभशा-2010/प्र.क्र.6/विजाभज-2, दिनांक 29 डिसेंबर,2011

**उदिदष्ट:-**

विमुक्त, जाती, भटक्या जमातीच्या आश्रमशाळा योजनेच्या धर्तीवर ज्या जिल्हयात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. अशा जिल्हयात स्वयंसेवी संस्थेमार्फत अनुसूचित जातीच्या मुला मुलींसाठी आश्रमशाळा ही योजना सन 1996-97 पासून सुरु करण्यात आली आहे.

**योजनेचे स्वरुप:-**

- **कर्मचारी वेतन:-** शालेय व वसतिगृह कर्मचारी यांना 100 % टक्के वेतन अनुदान देण्यात येते.
- **परिपोषण अनुदान:-** प्राथमिक शाळेतील निवासी विद्यार्थ्यांवर प्रति विद्यार्थी रु.1500/- प्रमाणे दरमहा 11 महिन्यासाठी व माध्यमिक शाळेसाठी 10 महिन्याकरीता स्वयंसेवी संस्थांना परिपोषण अनुदान देण्यात येते.
- **इमारत भाडे:-**इमारत भाडयापोटी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या भाडयाच्या 75% टक्के भाडे संस्थेस देण्यात येते.
- **आकस्मिक अनुदान:-** शिक्षक व अधिक्षकाच्या एकूण वेतनाच्या 15% टक्के रक्कम आकस्मिक खर्च म्हणून देण्यात येते.
- **सोयी सुविधा:-** निवास,भोजन,आंथरुण,पांघरुण,क्रिडा साहित्य इत्यादी सोयीसुविधा मोफत देण्यात येतात.
- **अनु.जाती आश्रमशाळांचीसंख्या:-** सद्यस्थिती जिल्हयात प्राथमिक व माध्यमिक विभाग मिळून अशी एकूण 1 अनु.जाती अनुदानित आश्रमशाळा कार्यरत असून त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

| **प्राथमिक आश्रमशाळा (इ.1 ली ते 7 वी)** | | **माध्यमिक आश्रमशाळा (इ.8 ली ते 10 वी)** | |
|---|---|---|---|
| प्राथमिक शाळांची संख्या | मंजूर निवासी विद्यार्थी संख्या | माध्यमिक शाळांची संख्या | मंजूर निवासी विद्यार्थी संख्या |
| 01 | 140 | 01 | 120 |

**संपर्क:-** 1) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद
2)संबंधित अनु.जाती आश्रमशाळेचे मुख्याध्यापक

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

# • सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना

1) शासन निर्णय क्र.इबीसी-1094/32038/प्र.क्र.90 मावक-2, दिनांक 12 जानेवारी 1996
2) शासन निर्णय क्र.इबीसी-2003/प्र.क्र.116 मावक-2, दिनांक 23 मे 2003
3) शासन निर्णय क्र.इमाव-2003/प्र.क्र.201 मावक-3, दिनांक 25 जुलै 2003
4) शासन निर्णय क्र.इबीसी-2003/प्र.क्र.417 मावक-2, दिनांक 31 मार्च 2005

**उदिदष्ट:-**

इयत्ता 5 वी ते 7 वी व इयत्ता 8 वी ते 10 मध्ये शिकणाऱ्या मागासवार्गीय (अनुसूचित जाती, विजाभ, विमाप्र) मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उददेशाने अनुक्रमे 1996 व 2003 पासून सावित्रीबाई फुले शिष्य्वृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे.

**अटी व शर्ती :-**

- उत्पन्न व गुणांची अट नाही.
- अर्ज करण्याची आवश्यकता नाही. वर्षातून तीन वेळा म्हणजे 26 जून, 22 सप्टेंबर आणि 3 जानेवारी या तारखांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

**शिष्यवृत्तीचे स्वरुप:-**

| इयत्ता | शिष्यवृत्तीचे दर | कालावधी |
|---|---|---|
| 5 वी ते 7 वी | रु.60/- दरमहा | 10 महिने |
| 8 वी ते 10 वी | रु.100/- दरमहा | 10 महिने |

**संपर्क:-** 1) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद
2)संबंधित शाळेचे मुख्याध्यापक

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

# • मॅट्रीकपूर्व शिक्षण फी, परिक्षा फी प्रदाने

1) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.इबीसी-1068/83567-जे/ दिनांक 24 डिसेंबर 1970
2) शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एफईडी-1096/1978/96/साशि-5 दि.13 जून 19
3) शासन निर्णय क्र.इबीसी-2011/प्र.क्र.97/शिक्षण-1, दिनांक 30 डिसेंबर 2011

**उदिदष्ट:-**

दिनांक 21.12.1970 च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती प्रवर्गातील इ.1 ली ते इ.10 वी मध्ये शिकत असणाऱ्या व ज्या विद्यार्थ्यांचे पालक महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असतील अशा विद्यार्थ्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व स्तरावरील मान्यता प्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती प्रमाणित दराने केली जाते.

शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक 13.6.1996 च्या शासन निर्णयान्वये प्रमाणित दराने शुल्क आकारणाऱ्या शासन मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित संस्थांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व सत्र शुल्क अदा केले जाते.

खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमध्ये इ.1 ली ते 10 वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील अनुसूचित जाती, विजाभज व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क प्रतिपुर्ती सन 2011-12 या शैक्षणिक वर्षापासून दरवर्षी 10 महिन्याच्या कालावधीकरीता खालील दराने अदा करण्यात येत आहे.

**शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क स्वरुप:-**

| **इयत्ता** | **शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क दर** | **कालावधी** |
|---|---|---|
| 1 ली ते 4 थी | रु.100/- दरमहा | 10 महिने |
| 5 वी ते 7 वी | रु.150/- दरमहा | 10 महिने |
| 8 वी ते 10 वी | रु.200/- दरमहा | 10 महिने |

**संपर्क:-** 1) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद
2)संबंधित शाळेचे मुख्याध्यापक

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

## ● माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती

1) शिक्षण व समाज कल्याण विभाग शासन निर्णय क्र.इबीसी-1066/54787-जे/दि. 29.8.1966
2) शासन निर्णय क्र.इबीसी-1094/प्र.क्र.109/मावक-2, दिनांक 17.08.1995
3) शासन निर्णय क्र.इबीसी-2003/प्र.क्र.466/मावक-2, दिनांक 09.02.2007

**उदिदष्ट:-**

इ.5 वी ते 7 वी मधील 2 गुणवत्ताधारक मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तसेच इ.8 वी ते 10 वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते.

**अटी व शर्ती :-**

- मान्यता प्राप्त प्राथमिक / माध्यमिक शाळेतील इ.5 वी ते 10 वी च्या वर्गामध्ये शिकणारा मागासवर्गीय विद्यार्थी असावा.
- ही शिष्यवृत्ती मागील वार्षिक परिक्षेत कमीत-कमी 50 टक्के व त्याहून अधिक गुण मिळवून मागासवर्गीय विद्यार्थ्यामधून प्रथम व दसुऱ्या क्रमांकात उतीर्ण झालेल्या गुणवत्ता प्रदान मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येईल.
- या शिष्यवृत्तीसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उत्पन्नाची अट राहणार नाही.
- यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शाळेतील नियमित हजेरी, समाधानकारक प्रगती व चांगली वर्तणुक असल्यास मंजूर करण्यात येईल.
- ही शिष्यवृत्ती दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या कालमर्यादेपुरतीच म्हणजेच जुन ते मार्च 10 महिन्यासाठी मंजूर करण्यात येते.
- ही शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अर्ज करण्याचयी आवश्यकता नाही.
- ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी सर्व मान्यताप्राप्त प्राथमिक व माध्यमिक शाळांकडून गुणवत्ताप्रधान मागासवर्गीय विद्यार्थ्यांची माहिती मागविण्यात येईल.

**स्वरुप:-**

| **इयत्ता** | **शिष्यवृत्ती दर** | **कालावधी** | **रुपये** |
|---|---|---|---|
| 5 वी ते 7 वी | रु.50/- दरमहा | 10 महिने जुन ते मार्च | 500/- |
| 8 वी ते 10 वी | रु.100/- दरमहा | 10 महिने जुन ते मार्च | 1000/- |

**संपर्क:-** 1) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद

2)संबंधित शाळेचे मुख्याध्यापक

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

# • अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती

1) सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय,नव्वी दिल्ली यांचे पत्र क्र.नं.11014/282002/SCD-V. दि.30/10/2003.
2) सुधारित शासन परिपत्रक क्र.इबीसी-2008/प्र.क्र.62/मावक-2, दिनांक 17.03.2009

**उदिदष्ट:-**

अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी व त्यांना समाज प्रवाहात आणणे कामी सदर शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. या शिष्यवृत्ती योजनेमध्ये केंद्र सरकारने सुधारणा केलेल्या असून त्याची अंमलबजावणी दि.01/04/2008 पासून लागू करण्यात आलेली आहे. अस्वच्छ व्यवसायात काम करणारे, अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबंधित सफाईगार, कातडी सोलणे, कातडी कमावणे या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या पाल्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.

**अटी व शर्ती :-**

- मान्यता प्राप्त प्राथमिक / माध्यमिक शाळेतील इ.5 वी ते 10 वी च्या वर्गामध्ये शिकणारा मागासवर्गीय विद्यार्थी असावा.
- ही शिष्यवृत्ती मागील वार्षिक परिक्षेत कमीत-कमी 50 टक्के व त्याहून अधिक गुण मिळवून मागासवर्गीय विद्यार्थ्यामधून प्रथम व दसुऱ्या क्रमांकात उतीर्ण झालेल्या गुणवत्ता प्रदान मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येईल.
- या शिष्यवृत्तीसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उत्पन्नाची अट राहणार नाही.
- यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शाळेतील नियमित हजेरी, समाधानकारक प्रगती व चांगली वर्तणुक असल्यास मंजूर करण्यात येईल.
- ही शिष्यवृत्ती दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या कालमर्यादेपुरतीच म्हणजेच जुन ते मार्च 10 महिन्यासाठी मंजूर करण्यात येते.
- ही शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अर्ज करण्याचयी आवश्यकता नाही.
- ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यासाठी सर्व मान्यताप्राप्त प्राथमिक व माध्यमिक शाळांकडून गुणवत्ताप्रधान मागासवर्गीय विद्यार्थ्यांची माहिती मागविण्यात येईल.

**लाभाचे स्वरुप:-**

1) 1 ली ते 2 री वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.110/- दरमहा व तदर्थ अनुदान रु.750/-
2) 3 ली ते 10 वी वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.110/- दरमहा व तदर्थ अनुदान रु.750
3) 3 ली ते 10 वी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.700/- दरमहा व तदर्थ अनुदान रु.1000/-

**संपर्क:-** 1) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद
2)संबंधित शाळेचे मुख्याध्यापक

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

- **इयत्ता 9 वी  व 10 वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना.**

1) शासन निर्णय क्रमांक: इबीसी-2012/प्र.क्र.-151/शिक्षण-1 दिनांक 04/10/2013.

**योजनेचा उद्देश:**

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे.

1. शासकीय मान्यता प्राप्त शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यास लागू राहील.

2. शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा रु. 2.लक्ष इतकी असावी.

3. विद्यार्थ्यांनी अर्ज करणे आवश्यक आहे.

**दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप : 10 महिन्यांसाठी**

| **अ.क्र.** | **योजना** | **वस्तीगृहात न राहणारे** | **वस्तीगृहात राहणारे** |
|---|---|---|---|
| 1 | शिष्यवृत्तीचे दर (□□□□□□□ह) | रु. 150 | रु. 350 |
| 2 | पुस्तके व तदर्थ अनुदान (□□□□□□□) | रु.750 | रु. 1000 |

**वरील प्रमाणे शिष्यवृत्तीशिवाय विनाअनुदानित शाळेतील अपंग विद्यार्थ्यांकरीता अतिरिक्त भत्ते पुढीलप्रमाणे आहेत.**

| **अ.क्र.** | **भत्याचा प्रकार** | **मासिक भत्याची रक्कम** |
|---|---|---|
| 1 | अंध विद्यार्थ्यांसाठी वाचक भत्ता | रु. 160/- |
| 2 | वस्तीगृहातील न राहणारे अपंग विद्यार्थ्यांकरीता वाहतूक भत्ता | रु. 160/- |
| 3 | अपंग विद्यार्थ्यांच्या सोबत्याकरीता भत्ता | रु. 160/- |
| 4 | अपंग विद्यार्थ्यांच्या मदतनीसकरीता भत्ता | रु.160/- |
| 5 | मंदबुध्दी विद्यार्थ्याकरीता शिकवणी भत्ता | रु. 240/- |

**अर्ज करण्याची पध्दत:** या योजनेसाठी https//mahaeschol.maharashtra.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक.

**संपर्क:-** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

- **इयत्ता 5 वी ते 7 वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती.**

1. शासन निर्णय क्रमांक : इबीसी-1094/32038/प्र.क्र. 90/मावक-2 दि. 12 जानेवारी 1996.
2. शासन निर्णय क्रमांक : इबीसी-2003/प्र.क्र. 417/मावक-2 दि. 31 मार्च 2005.

**योजनेचा उद्देश:**

1. मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी.
2. शिक्षणातील मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे.
3. शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य व्हावे.

**योजनेच्या अटी:**

1. विद्यार्थीनी विजाभज/विमाप्र प्रवर्गातील असावी.
2. इयत्ता 5 वी 7 वी मध्ये शिक्षण घेणारी असावी.
3. उत्पन्नाची अट नाही.
4. लाभधारक मुलगी शासनमान्य संस्थेत नियमित शिकत असावी.

**लाभाचे स्वरुप:**

प्रती विद्यार्थीनी प्रतीमहा रुपये 60/- प्रमाणे 10 महिन्यासाठी रुपये 600/- शिष्यवृत्ती देण्यात येते.

**संपर्क:-** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

- **इयत्ता 8 वी ते  10 वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती.**

शासन निर्णय क्रमांक : इमाव-2003/प्र.क्र. 201/मावक-3 दि. 25 जुलै 2003.

**योजनेचा उद्देश:**

1.विजाभज,विमाप्र, मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे,

2. मुलींचे शाळेतील उपस्थिती गळतीचे प्रमाण कमी व्हावे.

3. शिक्षणासाठी पालकांना आर्थिक सहाय्य व्हावे.

**योजनेच्या अटी:**

1. विद्यार्थीनी विजाभज/विमाप्र प्रवर्गातील असावी.

2. विद्यार्थीनी इयत्ता 8 वी 10 वी पुर्णवेळ शिक्षण घेणारी असावी.

3. उत्पन्नाची अट नाही.

4. लाभधारक मुलगी शासनमान्य संस्थेत शिकत असावी.

**लाभाचे स्वरुप:**

1. प्रती विद्यार्थीनी प्रतीमहा रुपये-100/- प्रमाणे दहा महिन्यांसाठी रुपये-1000/-

**संपर्क:-** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

- **माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या विजाभज व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकपूर्व गुणवत्ता शिष्यवृत्ती.**

1. शासन निर्णय क्रमांक: इबीसी-1094 प्र.क्र. 109/ मावक-2 दि. 17 ऑगस्ट 1995.

**योजनेचा उद्देश :**

1. विजाभज व विमाप्र प्रवर्गाचया मुलांमुलींना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी.

2.शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे.

3. विजाभज/ विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी.

योजनेच्या अटी :

1. लाभार्थी हा मान्यताप्राप्त संस्थेत शिक्षण घेत असावा.

2. लाभार्थी हा विजाभज/विमाप्र प्रवर्गातील असावा.

3. लाभार्थी हा वार्षिक परिक्षेत 50 % पेक्षा जास्त गुण घेऊन वर्गात प्रथम/व्दितीय क्रमांकाने उत्तीर्ण असावा.

लाभाचे स्वरुप:

1. इयत्ता 5 वी ते 7 वी रुपये 20 प्रमाणे 10 महिन्याला रुपये 200/- शिष्यवृत्ती.

2. इयत्ता 8 वी ते 10 वी रुपये 40 प्रमाणे 10 महिन्याला रुपये 400/- शिष्यवृत्ती.

**संपर्क:-** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

- **माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या विजाभज व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण फी परीक्षा फी प्रदाने.**

1. शासन निर्णय क्रमांक: इबीसी-1068/83567/जे.दिनांक 24 डिंसेबर 1970 (विजाभज)
2. शासन निर्णय क्रमांक: इबीसी-1094/प्र.क्र.91/मावक-2 दिनांक 29 ऑक्टोबर 1996 (विमाप्र)
3. शासन निर्णय क्रमांक: इबीसी-2011 प्र.क्र. 97/शिक्षण-1 दिनांक 30 डिंसेबर 2011.

**उद्दिष्ट:**

1. विजाभज व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्याचे शैक्षणिक गळतीचे प्रमाण कमी व्हावे.
2. शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे.
3. आर्थिक सहाय्य करणे.

**योजनेच्या अटी:**

1. मान्यता प्राप्त शिक्षण संस्थेत लाभार्थी शिकत असावा.
2. उत्पन्नाची व वयाची अट नाही.
3. लाभार्थी हा शाळेत नियमित हजर असला पाहिजे.
4. विद्यार्थी विजाभज/विमाप्र संवर्गातील असावा.

**लाभाचे स्वरुप:**

1. प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी शासनाने प्रमाणित केलेली शैक्षणिक शुल्क परिक्षा शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येते.
2. खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळेमधील 1 ली ते 10 वी मध्ये दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील शिकणाऱ्य विद्याार्थ्यांना शहरी/ ग्रामीण पालिका क्षेत्रानुसार रु. 100/- ते 200/- दरमहा दराप्रमाणे 10 महिन्यासाठी शिक्षण फी प्रतिपूर्ती करण्यात येते.

**संपर्क:-** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

- **स्वयंसेवी संस्थामार्फत दिव्यंगाना विशेष शिक्षण देणाऱ्या अनुदानित विशेष शाळा/कर्मशाळा**

**उद्दिष्ट: -**

1. विशेष शाळा- 6 ते 18 वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत विशेष शिक्षण.

2. विशेष कार्यशाळा -18 ते 45 वयोगटातील दिव्यांग किंवा प्रौढ व्यक्तींना मोफत विशेष प्रशिक्षण.

**लाभाचे स्वरुप:**

1. **विशेष शाळा:-** अंध, मुकबधिर,मतिमंद,अस्थिव्यंग विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण पध्दीतीने व विशेष शैक्षणिक साहित्याचा वापर करुन मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणे यासह निवास व भेजनांची व्यवस्था करणे.

2. **विशेष कार्यशाळा:-अंध,** मुकबधिर,मतिमंद व अस्थिव्यंग प्रौढ व्यक्तींना विशेष प्रशिक्षणव्दारे दिव्यांत्वानुसार विविध व्यवसायाचे विशेष प्रशिक्षण देणे यासह मोफत निवास व भोजनाची व्यवस्था करणे.

**स्वयंसेवी संस्थाना अर्थसहाय्य:**

1. **वेतन:-** कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे मान्य कर्मचाऱ्यांचे 100 टक्के वेतन खर्च

2. **वेतनेत्तर:-** वेतन खर्चाच्या 8 टक्के मर्यादित.

3. **इमारत भाडे:-** सार्वजनिक बांधकांम विभागाच्या भाडे प्रमाणपत्रा प्रमाणे मान्य क्षेत्रफळाचे 75 टक्के इमारत भाडे.

4. **परिपोषण अनुदान :-** अंध ,कर्णबधिर, व अस्थिव्यग प्रवर्गातील प्रति विद्यार्थी रुपये 1500/- व मतिमंद प्रबर्गातील प्रति विद्यार्थी रुपये 1650/- प्रमाणे 10 महिन्यंकरीता.

- **अनुदानित दिव्यांग शाळांची संख्या:-** जिल्हयात दिव्यांग प्रवर्गनुसार अनुदानित दिव्यांग शाळांची संख्या व विद्यार्थी संख्या बाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | प्रवर्ग | शाळांची संख्या | मान्य विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| 1 | **मुकबधीर प्रवर्ग** | 10 | 156 |
| 2 | **अस्थिव्यंग प्रवर्ग** | 08 | 110 |
| 3 | **मतिमंद प्रवर्ग (शाळा/बालगृह)** | 07 | 187 |
| 4 | **अंध प्रवर्ग** | 01 | 15 |
| | **एकूण** | 26 | 468 |

**संपर्क:-** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

## • शालांत पूर्व शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.

सामाजिक न्याय सांस्कृतीक कार्य क्रीडा व विशष सहाय्य विभाग शासन निर्णय :- इडीडी-2003/प्र.क्र.70/सुधार -2 दिनांक 15/11/2003 व क्र. अपंग 2013/प्र.क्र.91/ अ.क.02, दि. 30/08/2014.

| उद्दिष्ट | दिव्यांग विर्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे |
|---|---|
| निकष | 1. इयत्ता 10 वी पर्यंतचे शिक्षण घेणारे अंध, कर्णबधीर व अस्थिव्यंग प्रवर्गातील विद्यार्थी तसेच विशेष शाळेतील मतिमंद विद्यार्थी.<br>2. विद्यार्थ्याकडे किमान 40 वा त्यापेक्षा जास्त टक्यांचे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असावे.<br>3. विद्यार्थी एकाच इयत्तेते दोन वेळा नापास झालेला नसावा. |

| लाभाचे स्वरुप | अ.क्र. | इयत्ता | शिष्यवृत्ती दर रुपये |
|---|---|---|---|
| | 1 | इयत्ता 1 ली ते 4 थी (□□□□□□□□□ पायरी □□□□□□□□□□□) | दरमहा रुपये 100/- |
| | 2 | इयत्ता 5 वी ते 7 वी | दरमहा रुपये 150/- |
| | 3 | इयत्ता 8 वी ते 10 वी | दरमहा रुपये 200/- |
| | 4 | मतिमंद मानसिक विकलांग<br>( नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त विशेष शाळेतील) | दरमहा रुपये 150/- |
| | 5 | दिव्यंग कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थी | दरमहा रुपये 300/- |

**संपर्क :-** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

## • शालांत परीक्षोत्तर मॅट्रीकोत्तर शिकक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.

सामाजिक न्याय सांस्कृतीक कार्य क्रीडा व विशष सहाय्य विभाग शासन निर्णय :- इडीडी-2003/प्र.क्र.71/सुधार -2 दिनांक 15/11/2003 व शासन निर्णय क्र. अपंग 2013/प्र.क्र.91/ अ.क.02, दि. 30/08/2014.

| | | | |
|---|---|---|---|
| **उद्देश** | दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणसाठी प्रात्साहन करणे. | | |
| **निकष** | 1. इयत्ता 10 वी पुढील शिक्षण घेणारे अंध,कर्णबधिर व अस्थिव्यंग प्रवर्गातील विद्यार्थी विद्यार्थ्याकडे<br>किमान 40 वा त्यापेक्षा जास्त टक्यांचे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असावे.<br>2. विद्यार्थी एकाच इयत्तेत दोन वेळा नापास झालेला नसावा. | | |
| **लाभाचे स्वरुप** | **अभ्यासक्रमाचा गट** | **शिष्यवृत्तीची रक्कम** | |
| | | **वस्तीगृहात राहणारे** | **वस्तीगृहात न राहणारे** |
| | 1. गट अ (वैद्यकिय व अभियांत्रिकी पदवी शिक्षण ॲग्रीकल्चर, व्हेटरनरी मधील पदवी व पदव्युत्तर शिक्षण)<br>2. गट ब (अभियांत्रिकी तांत्रिक, स्थापत्य वैद्याकशास्त्र,पदविका अभ्यासक्रम)<br>3.गट क (कला विज्ञान वाणिज्य मधील पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच व्यावसायिक पदविका अभ्यासक्रम)<br>4. गट ड (व्दितीय वर्ष व त्यानंतर पदवीपर्यंतचा अभ्यासक्रम)<br>5. गट इ (11 वी,12 वी व पदवी प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम.) | दरमहा रुपये 1200/-<br>दरमहा रुपये 820/-<br>दरमहा रुपये 820/-<br>दरमहा रुपये 570/-<br>दरमहा रुपये 380/- | दरमहा रुपये 550/-<br>दरमहा रुपये 530/-<br>दरमहा रुपये 530/-<br>दरमहा रुपये 300/-<br>दरमहा रुपये 230/- |
| | शिष्यवृत्तीच्या रक्कमेबरोबर विद्यापीठांना/ शिक्षण शुल्क समितीने मान्य केलेल शिक्षण शुल्क, अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता, प्रकल्प टंकलेखन खर्च अभ्यासदौरा खर्च देण्यात येतो. | | |
| **संपर्क** | संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद. | | |

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

# • स्वयंरोजगारासाठी दिव्यांग व्यक्तींना वित्तीय सहाय्य (बीजभांडवल)

सामाजिक न्याय विशष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रं.:- अपंग-2008/प्र.क्र.2012/सुधार -3 दि. 02/07/2010.

**उद्देश :** दिव्यांग व्यक्तींना लघुउद्योगासाठी वित्तीय सहाय्य उपलब्ध करुन देणे.

**निकष:** 1. वार्षिक उत्पन्न रुपये 1.00 लाखापेक्षा कमी असावे.

2. दिव्यांग व्यक्तींचे किमान 40 वा त्यापेक्षा जास्त टक्यांचे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असावे.

3. वय 18 ते 50 वर्ष यामधील असावे.

4. महाराष्ट्र राज्यचा रहिवासी असावा.

**लाभाचे स्वरुप:** रुपये 1.50 लाखापर्यंतच्या व्यवसायाकरीता 80 टक्के बँकेमार्फत कर्ज व 20 टक्के अथवा कमाल रुप्ये 30000/- सबसिडी स्वरुपात अर्थसहाय्य.

**संपर्क:-** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

# • दिव्यांग कल्याण राज्य पुरस्कार

सामाजिक न्याय विशष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रं.:- इडीडी-2010/प्र.क्र.73/सुधार -2 दिनांक 18/05/2010.

**उद्दिष्ट:** गुणवंत दिव्यांग कर्मचरी, स्वयंउद्योजक तसेच त्यांचे नियुक्ती संस्थांना पुरस्कार देणे.

**निकष:** 1. पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्याकडे किमान 40 वा त्यापेक्षा जास्त टक्यांचे दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असावे.

2. महाराष्ट्र राज्याचा रहीवाशी असावा.

3. दिव्यांग व्यक्ती शासकीय/सार्वजनिक/खाजगी नोकरीत/स्वयंउद्योजक असावा.

4. नियुत्तकाच्या बाबतीत जास्तीत जास्त दिव्यांग व्यक्तींना सेवेत घेतले असावे.

**लाभाचे स्वरुप:** 1. दिव्यांग कर्मचारी/ दिव्यांग स्वयंउद्योजक रुपये 10000/- रोक्ष शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र.

2. नियुक्ती व संस्थेस रुपये 25000/- रोख स्मरणचिन्ह शाल व श्रीफळ.

**संपर्क:-** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

# • दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषिके

**उद्देष्ट:** राज्यातील विभागीय माध्यमिक व उच्च माध्यकिम शिक्षण मंडळामधून इयत्ता 10 वी व 12 वी उत्तीर्ण होणाऱ्या प्रथम तीन क्रमाकांच्या प्रत्येकी तीन दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषक देण्यात येते.

**निकष:** राज्यतील इयत्ता 10 वी 12 वीच्या परिक्षांमध्ये विभागीय परिक्षा मंडळामधून प्रत्येक विभाग निहाय गुणवत्ता यादीप्रमाणे अधिक गुण मिळालेले असले पाहिजे.

**लाभाचे स्वरुप:** विभागीय माध्यमिक व उच्च माध्यकिम शिक्षण मंडळामधून इयत्ता 10 वी व 12 वी उत्तीर्ण होणाऱ्या प्रथम तीन क्रमांकाच्या प्रत्येकी तीन दिव्यांग विद्यार्थ्यांना रुपये 1000/- रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात येतो.

**संपर्क:-** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

## • दिव्यांग- अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना.

सामाजिक न्याय विशष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र:- अपंग -2013/प्र.क्र.103/अ.क्र 2, दिनांक 17/06/2014.

**उद्दिष्ट: दिव्यांग व दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देणे व विवाहासाठी आर्थिक सहाय्य करणे.**

**निकष:** 1. विहीत नमुन्यात जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

2. अर्जदाराचे दिव्यांगत्व किमान 40 टक्के अथवा त्यापेक्षा जास्त असावे.

3. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

**लाभाचे स्वरुप:** किमान 40 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग वधू किंवा वराने दिव्यांगत्व नसलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास अथवा दिव्यांगत्व नसलेल्या वधू किंवा दिव्यांगत्व असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास

**या योजनेतून खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येईल.**

अ) रक्कम रुपये 25000/- चे बचत प्रमाणपत्र

ब) रुपये 20000/- रोख स्वरुपात.

क) रुपये 4500/- संसार उपयोगी साहित्य/ वस्तू खरेदीसाठी देण्यात येईल.

ड) रुपये 500/- स्वागत समारंभाच्या कार्यक्रमाचा खर्च करण्यासाठी देण्यात येईल.

**संपर्क:-** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

# . मतिमंद बालगृहे योजना.

शासन निर्णय क्र. बालगृ-2011/ प्रक्र. 338/का-8 दिनांक 30/05/2012.

**उद्देष्ट:** बालहक्क मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम 2000 व सुधारीत नियम 2006 अन्वये अनाथ मतिमंद बालकांसाठी एकुण 19 विशेष बालगृहे स्वयंसेवी संस्थाकडून चालविली जात असुन राज्तील 13 जिल्हामध्ये ही बालगृहे कार्यरत आहे.

**निकष:** 1. विहीत नमुन्यात बाल कल्याण समिती यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

2. अर्जदाराचे दिव्यांगत्व किमान 40 टक्के अथवा त्यापेक्षा जास्त असावे तो अनाथ असावा.

3.अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

**लाभाचे स्वरुप:** या बालगृहामधील प्रवेशितांना दिव्यांगाच्या विशेष शाळा /कर्मशाळा तसेच वस्तीगृहांना असलेल्या निकषानुसारच देखभाल व निर्वाहासाठी अनुदान देण्यात येत असून शैक्षणिक,आरोग्यविषयक सेवा- सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**संपर्क:**- संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

# • अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे

1. शासन निर्णय क्रमांक दवसु-2008/प्र.क्र.524/विघयो-1, दिनांक 14 मार्च,2008
2. शासन निर्णय क्रमांक दवसु-2011/प्र.क.442/अजाउयो, दिनांक 5 डिसेंबर,2011
3. शासन शुध्दीपत्रक क्रमांक दवसु-2011/प्र.क्र442/अजाउयो, दिनांक 31 डिसें.,2011, दिनांक 2 जुलै 2012
4. शासन निर्णय क्रमांक दवसु-2013 /प्र.क्र.85/अजाक-1, दिनांक 1 ऑगस्ट,2013
5. शासन निर्णय क्रमांक दवसु-2015/प्र.क्र.59/अजाक-1, दिनांक 27 मे,2015

**उद्दिष्ट: -** अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी प्रत्येक अनुसूचित जाती व नवबौध्द वस्त्यांमध्ये नळ पाणी पुरवठा, गटारे, स्वच्छता विषयक सोयी, जोड रस्ते, समाज मंदीर, इत्यादी पायाभूत व्यवस्था करुन त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी ही योजना आहे.

**लाभाचे स्वरुप-** शासन निर्णय, दिनांक 5 डिसेंबर 2011 अन्वये लोकसंख्येच्या निकषानुसार प्रत्येक अनुसूसित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात खालीलप्रमाणे अनुदान देण्यात येते.

| **अ.क्र.** | **लोकसंख्या** | **अनुदान (रु)** |
|---|---|---|
| 1 | 10 ते 25 | 2 लक्ष |
| 2 | 26 ते 50 | 5 लक्ष |
| 3 | 51 ते 100 | 8 लक्ष |
| 4 | 101 ते 150 पर्यंत | 12 लक्ष |
| 5 | 151 ते 300 | 15 लक्ष |
| 6 | 301 च्या पुढे | 20 लक्ष |

- या योजने अंतर्गत ध्यावयाच्या कामांचा सन 2018-19 पासून पुढील पाच वर्षाचा बृहत आराखडा तयार करण्यात आलेला आहे. तो संबंधित जिल्हयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. जिल्हयात 2106 अनुसूचित जाती व नवबैाध्द वस्त्या आहेत.
- बृहत आराखडयामध्ये नमुद असलेल्या कामाचा प्रस्ताव योग्य त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायतीने तयार करुनगट विकास अधिकारी यांचेमार्फत जिल्हापरिषदेच्या समाज कल्याण विभागाकडे सादर करणे अपेक्षित आहे.
- **जिल्हयात अनुसूचित जाती लोकसंख्या:-**

| पुरुष | महिला | **एकूण** |
|---|---|---|
| 136354 | 128830 | 265184 |

**संपर्क:-** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

## • व्यसनमुक्ती  प्रचार कार्य व्यसनमुक्ती उपचार व मार्गदर्शन ( केंद्र पुरस्कृत)

शासन निर्णय विभाग क्रमांक : अ.शा.-प्र. क्र. 15011/202/ पी.यू. दि. 29 मे 2002.

सदर योजना केंद्र शासनाची असून सामाजिक न्याय विभागांतर्गत जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषदे मार्फत  राबविली जाते.

**उद्दिष्टे:** व्यसनामधील लोकांना व्यसनमुक्ती करणे.

**लाभाचे स्वरुप:** मान्यता प्राप्त व्यसनमुक्ती केंद्रास केंद्र शासनाकडून  अनुदान देण्यात येते.

**संपर्क:** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**आव्हान :** अंमली पदार्थाचा प्रश्न हे एक जागतिक आव्हाण आहे. भारत देश आता आनेक प्रकारच्य अमंली पदार्थाचा मोठा ग्राहक    बनु पाहात आहे. काही पाहणी अहवालानुसार हा प्रश्न समाजाच्या सर्व स्तरात पसरला आहे.   विशेषत: झेपडपट्टया,वाहतुक   कर्मचारी आणि युकांमध्ये अमंली पदार्थाचे व्यसन वैयक्तीक जीवन कुंटुंबे आणि समाज उध्दवस्त करते सीरीज आणि  इंजक्शनच्या सुया एकमेकांमध्ये वापरल्याने अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांमध्ये एच.आय.व्ही. एड्सचा प्रादूर्भाव होतो.

**उपाय योजना:**

- अंमली पदार्थाविरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी.
- उपचार आणि व्यसनींचे पुनर्वसन.
- या प्रश्नाच्या लढाईत समाज,विशेत: युवकांचा सहभाग.

**कृती योजना:**

- ओळख.जागृती,प्रबोधन, उपचार, आणि नंतरची काळजी या स्वरुपातील समाजाभिमुख कार्यक्रम.
- अंमली पदार्थाच्या दुष्परीणामागद्‌ल जनजागृती.
- जागृतीच्या कामातील सेवकांचे प्रशिक्षण.

**संपर्क:** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

# • आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य.

1. शासन निर्णय क्रमांक: युटीए-1093/455/प्र.क्र.-203/मावक-2 दि. 12 जानेवारी 1996.
2. शासन निर्णय क्रमांक: सीबीसी-1098/प्र.क्र.-151/मावक-5 दि. 7 मे 1999.
3. शासन निर्णय क्रमांक:-आंजावि-2007/प्र.क्र.-191/मावक-2 दि. 1 फेब्रुवारी 2010.

**उद्दिष्ट:** राज्यातील जातीयता भेदाभेद कमी करण्यासाठी जातीय सलोख निर्माण करण्यासाठी आंतरजातीय विवाहित जोडप्यांना अर्थसहाय्य देणे ही योजना सुरु करण्यात आलेली आहे.

**स्वरुप:** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यापैकी एक व्यक्ती आणि सवर्ण हिंदू,जैन, लिंगात,बौध्द, शीख या पैकी दुसरी व्यक्ती अशांनी विवाह केल्यास तसेच मागावर्गीतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या, जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विवाहित जोडप्यांना या योजने अंतर्गत रु. 50000/- अर्थसहाय्य देण्यात येते. सदर धनाकर्ष पती पत्नीच्या संयुक्त नावाने प्रदान करण्यात येतो.

**संपर्क:** संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

# • वृध्द कलावंत मानधन योजना.

शासन निर्णय समाज कल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग क्रं.डिटी डबल्यु १२६५ / एन दि.१.०८.१९६५ शासन निर्णय क्रं.वृकमा २०१२ /प्र.क्र.१७ /सा.का-४ पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग दिनांक ०७.०२.२०१४ नुसार महाराष्ट राज्यातील मान्यवर साहित्यीक व कलावंत यांना मानधन योजना

१. योजनेचे नांव:- महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वध्द साहित्यीक व कलावंत यांना मानधन योजना

२. योजनेचे कार्यक्षेत्र :- उस्मानाबाद जिल्हयातील संपूर्ण भाग

३. योजनेचा उद्देश :- मान्यवर वृध्द साहित्यीक व कलावंताच्या कलेला वाव मिळणे व आर्थीक उन्नती घडवून आणणे.

**४. योजनेच्या अटी व शर्ती.**

अ. अर्जदार किमान १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे आवश्यक आहे.

आ. स्त्री / पुरुष वृध्द साहित्यीक व कलाकाराचे वय किमान ५० वर्षापेक्षा जास्त असावे.

इ. ज्या साहित्यीक व कलावंताचे सर्व मार्गाने मिळून वार्षीक उत्पन्न रु.४८०००/- पेक्षा जास्त नसावे.

ई. साहित्य व कला या क्षेत्रात ज्यांनी मोलाची भर घातली आहे अशी व्यक्ती.

उ. कला आणि वाङ:मय क्षेत्रात ज्यांनी किमान १५ ते २० वर्ष इतका प्रदिर्घ काळासाठी महत्वपूर्ण कामगिरी केली आहे अशी व्यक्ती.

ऊ. शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेखाली नियमित मासीक आर्थीक लाभ घेणारी व्यक्ती या मानधन योजनेखाली लाभ घेण्यास पात्र राहणार नाही.

ऋ. शासन निर्णयानुसार पंचायत विभागाकडून प्रस्ताव मागवून त्याची छाननी करण्यात येत असुन जिल्हा निवड समिती मार्फत पात्र लाभर्थ्याची निवड करण्यात येते.

**लाभाचे स्वरुप :- अ,ब,क,ड वर्गवारीनुसार**

**राष्ट्रीयस्तर- अ** रु.३१५० प्रतिमाह

**राज्यस्तर-ब** रु.२७००/- प्रतिमाह,

**स्थानिकस्तर-क** रु.२२५०/- प्रतिमाह

**संपर्क :-** १. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती सर्व

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
**जिल्हा परिषद उस्मानाबाद**

## • जि.प. स्वसंपादीत उत्पन्नातून २० टक्के सेस मागासवर्गीयासाठी योजना

1. शासन निर्णय क्र. मागास १०९३/प्र.क्र.१२३९/३४ / मंत्रालय, मुंबई ३२ दि.०१/०९/१९९३.
2. शासन निर्णय क्र डीसीटी२३१६/प्रक्र.१३३/का.१४९७ दिनांक ०५.१२.२०१६..
3. शासन निर्णय क्र डीबीटी २०१६/प्रक्र.९०/वित्त-९ दिनांक ०९.०१.२०१७

.

**उद्दिष्ट**: मागासवर्गीयांचे आर्थिक व सामाजिक उन्नती घडवून आणणे.

**स्वरुप:** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यांना वैयक्तिक व सामूहिक लाभ देणे

**निकष:** १. विहीत नमुन्यात अर्ज समाज कल्याण विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे.
२.लाभार्थी ग्रामीण भागातील अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती,विजाभज,विमाप्र प्रवर्गातील मागासवर्गीय असावी.
३.लाभार्थीचे वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र असावे/लाभार्थी दारीद्ररेषेखालील असावा.
४.अर्जदार उस्मानाबाद जिल्हयाचा ग्रामीण भागाचा रहिवासी असावा
५. लाभार्थी निवड समाज कल्याण समितीकडून करण्यात येईल.

**संपर्क:** १. जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.
२. संबंधित गविकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) जिल्हा उस्मानाबाद.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

# • जि.प. स्वसंपादीत उत्पन्नातून ५ टक्के सेस दिव्यांगासाठी योजना

१. शासन निर्णय क्र. जिपउ२०१८/प्र.क्र.५४/वित्त-३ दि. २५/०६/२०१८.

.

**उद्दिष्ट:** दिव्यांगाचे आर्थिक व सामाजिक उन्नती व पुर्नवसन घडवून आणणे.

**स्वरुप:** दिव्यांग यांना वैयक्तिक व सामूहिक लाभ देणे

**निकष:** १. विहीत नमुन्यात अर्ज समाज कल्याण विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे.

२. लाभार्थी उस्मानाबाद जिल्हयातील ग्रामीण भागातील दिव्यांग असलेबाबत (४० टक्के )जिल्हा शल्य चिकित्सक यांचे ऑनलाईन /युडीआडी वैदयकीय प्रमाणपत्र असलेली असावी.

३.लाभार्थीचे वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र असावे/लाभार्थी दारीद्ररेषेखालील असावा

४.अर्जदार उस्मानाबाद जिल्हयाचा ग्रामीण भागाचा रहिवासी असावा

५. लाभार्थी निवड समाज कल्याण समितीकडून करण्यात येईल.

**संपर्क:** १. जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद.

२. संबंधित गविकास अधिकारी पंचायत समिती (सर्व) जिल्हा उस्मानाबाद.

.

**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
जिल्हा परिषद उस्मानाबाद

# समाजकल्याण विभाग
# जिल्हा परिषद,उस्मानाबाद

मार्फत राबविण्यात येणाऱ्या
विविध योजनांची पुस्तिका

जा.क्र.जिपसकविउ/योजना/माहिती पुस्तिका
2020-21/ दि.06/01/2021
कार्यालय,जिल्हा समाज कल्याण
आधिकारी,जि.प.उस्मानाबाद

प्रति,
जिल्हा माहिती आधिकारी,
कार्यालय, उस्मानाबाद

**विषय:- जिल्हा समाज कल्याण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती पुस्तिका सादर करणेबाबत.**

संदर्भ:- मा.जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेली आढावा बैठक दि.31.12.2020

उपरोक्त विषयी सादर करण्यात येते की, मा.जिल्हाधिकारी यांनी दिनांक 31/12/2020 रोजी झालेल्या आढावा बैठकीत जिल्हा परिषदेतील सर्व कार्यालयाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती पुस्तिका तयार करुन सादर करणेबाबत निर्देश देण्यात आले होते.

त्यानुषंगाने जिल्हा परिषद समाज कल्याण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती पुस्तिका आपणास सादर करण्यात येत आहे.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर.**

1. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
2. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद
3. मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद